## नि.दि.मु.क्र. १८०/२०१४ मधील निशाणी ७९ वरील आदेश

सदरहू अर्ज वादीनी, मयत वादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेल्या विलंब माफ होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पुष्टयर्थ वादीने शपथपत्र दाखल केले आहे. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, मयत वादी क्र. १ संदिप शिवाजीराव पवार हे दि.३१/०१/२०२१ रोजी मयत झाले. अर्जामधील नमूद कारणांमुळे विहीत कालावधीमध्ये वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली. प्रतिवादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्ज र.रू. ५०००/– चे खर्चावर मंजूर करण्यात यावा.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. मयत वादी क्र. १ हे दि. ३१/०१/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदरचा अर्ज दि. २२/०९/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदरचा अर्ज दाखल करणेस अंदाजे एक वर्षे तीन महिने विलंब झालेला आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण अर्जामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सदरचा दावा ताकीद व दावा कलम १क मधील अतिक्रमीत बांधकाम स्वतःचे खर्चाने पाडून कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. झालेला विलंब हा प्रतिवादीना योग्य तो खर्च देवून त्याची भरपाई करण्यासारखा आहे. सबब, खालील आदेश.

### – : आ दे श :–

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ७९) रक्कम रुपये २००/– चा खर्च प्रतिवादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) नि.क्र. ८१ वरील अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब हा येणेप्रमाणे माफ करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2022.10.14 17:17:39 +0530

पाटण (प्र.शं. गिरगांवकर )

दि. १४/१०/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.